# BDC LIBRARY
## New Paper Clipping
*A.Y. 2024-2025*

# बाळासाहेब देसाई महाविद्यालयात शुक्रवारी पारितोषिक वितरण समारंभ

▲ पाटण, दि. ५ : येथील बाळासाहेब देसाई कॉलेजमध्ये शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विनोदी लेखक, प्रसिद्ध वक्ते व कथाकार डॉ. संजय कळमकर उपस्थित राहणार आहेत.

समारंभानिमित्त आय. क्यु. ए. सी. फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ग्रंथ प्रदर्शन, मेहंदी डिझाईन स्पर्धा, फोटोग्राफी प्रदर्शन व स्पर्धा, गायन, वादन व नृत्य, कथाकथन व लघुनाटिका प्रस्तुतीकरण, काव्य वाचन व गायन, फनी गेम्स, फूड फेस्टिव्हल व पारंपरिक वेशभूषा स्पर्धा होणार आहेत.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्याध्यक्ष म्हणून वरिष्ठ विभागाकरिता आय. क्यु. ए. सी समन्वयक डॉ. सी. एच. व्ही. कांटे व कनिष्ठ विभागाकरिता प्रा. सौ. एन. ए. कदम काम पाहणार आहेत. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्याध्यक्षांनी विविध समितींचे गठन केले आहे. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी केले आहे.